# ‘नरेंद्र मोदी, योगी आदित्यनाथ यांचे नाव घेण्यासाठी दबाव होता!’

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर यांनी २००८ च्या मालेगाव स्फोट प्रकरणातून निर्दोष मुक्त झाल्यानंतर रविवारी भोपालमध्ये भव्य स्वागत झाल्यानंतर काँग्रेसवर जोरदार टीका केली.

त्या म्हणाल्या की, “मालेगाव स्फोट काँग्रेसने रचलेली कटकारस्थाने होती आणि त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला चालवला पाहिजे.”







साध्वी प्रज्ञा म्हणाल्या की, भगवा दहशतवादाचा आरोप हा हिंदूंना बदनाम करण्याचा काँग्रेसचा डाव होता. “हा निकाल हा देशविरोधक आणि गद्दारांच्या चेहऱ्यावर काळं फासणारा आहे,” असं त्यांनी स्पष्ट केलं. काँग्रेसने मुस्लिम मतांच्या तुष्टीकरणासाठी हिंदूंवर खोटे आरोप लावले व त्यांना तुरुंगात डांबले, असं त्यांनी सांगितलं.

**मालेगाव स्फोट प्रकरण:**

२९ सप्टेंबर २००८ रोजी मालेगावमध्ये मोटारसायकलला बॉंब लावून स्फोट घडवण्यात आला होता. यात सहा जण ठार झाले व सुमारे १०० जण जखमी झाले होते. १७ वर्षांनी, विशेष एनआयए न्यायालयाने पुरावा अभावामुळे साध्वी प्रज्ञा व इतर सात आरोपींना निर्दोष मुक्त केले. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या व्यक्तींशी हिंदुत्ववादी संघटनांचा संबंध जोडण्याचा प्रयत्न केला गेला होता.

**मोदी व योगींचं नाव घेण्यासाठी दबाव**

साध्वी प्रज्ञा यांनी असा आरोप केला की, तपास यंत्रणांनी नरेंद्र मोदी आणि योगी आदित्यनाथ यांची नावं जबरदस्तीने घेण्यासाठी त्यांच्यावर अमानुष अत्याचार केले. त्या म्हणाल्या, “माझ्यावर मोठ्या व्यक्तींची नावं घेण्यासाठी प्रचंड दबाव आणला गेला. पण मी मोडले नाही. कोणालाही खोटं फसवले नाही. म्हणून मला खूप छळ सहन करावा लागला.”

**साध्वी प्रज्ञा यांचा संदेश:**

त्या म्हणाल्या की, सत्य आणि धर्म नेहमी जिंकतो. “सत्य आमच्याकडे होतं. धर्म आमच्याकडे होता. हा निकाल त्याचा पुरावा आहे,” असं त्यांनी ठामपणे म्हटलं.

राष्ट्रवादाचा बुलंद आवाज

# न्यूज डंका महाराष्ट्र

मुंबई । पुणे । नाशिक जिल्ह्यात एकाच वेळी वितरित होणारे दैनिक

मुख्य संपादक : दिनेश कानजी

मुंबई >> सोमवार, ४ ऑगस्ट २०२५ >> वर्ष ४ >> अंक ७१ >> पाने ६ >> किंमत ५ रुपये

## झटपट डंका

### कुलगाममध्ये आतापर्यंत 3 दहशतवादी ठार



जम्मू-कश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यात सुरक्षादलांचे दहशतवाद्यांविरुद्ध ऑपरेशन सलग तिसऱ्या दिवशी, म्हणजे रविवारीही सुरू राहिले. या मुठभेदीदरम्यान ३ दहशतवाद्यांना ठार करण्यात आले आहे. सेना, सीआरपीएफ आणि जम्मू-कश्मीर पोलीस यांच्या संयुक्त पथकाने शुक्रवारी कुलगामच्या अखाल जंगल परिसरात मिळालेल्या खुफिया माहितीनुसार शोधमोहीम सुरू केली होती. परिसराची सुरक्षादलांनी वेढा घातल्यानंतर गोळीबार सुरू झाला, >> पान...५ वर

### ‘विरोधी पक्ष म्हणजे केवळ पप्पूची आघाडी



राष्ट्रीय जनता दलाचे नेते आणि बिहारचे माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव हे पुन्हा एकदा वादात सापडले आहेत. त्यांनी अलीकडेच चुनाव आयोगावर प्रश्न उपस्थित करत एक मतदार ओळखपत्राचा (EPIC नंबर) फोटो दाखवला, पण भाजपाचा दावा आहे की तो नंबर बनावट असून तेजस्वी यादवचा खरा EPIC नंबर वेगळाच आहे, जो निवडणूक आयोगाच्या अधिकृत यादीत नोंदवलेला आहे. भाजपाचे नेते अमित मालवीय यांनी रविवारी ‘एक्स’वर पोस्ट करत तेजस्वींवर निशाणा साधला. >> पान...५ वर

### पाकिस्तानची भाषा बोलत आहेत मणिशंकर अय्यर



भाजप खासदार प्रविण खंडेलवाल यांनी काँग्रेस नेते मणिशंकर अय्यर यांच्या पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यावरील वादग्रस्त विधानाची तीव्र शब्दांत निंदा केली आहे. खंडेलवाल म्हणाले की, “अय्यर पाकिस्तानची भाषा बोलत आहेत आणि हे अत्यंत दुर्दैवी आहे की विरोधी पक्षाचे नेते पाकिस्तानच्या इशाऱ्यावर काम करत आहेत. अय्यर यांनी म्हटले होते की, “या हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग असल्याचा कोणताही पुरावा नाही.” >> पान...५ वर

### देवेंद्र फडणवीसांनी सांगितली शिवसेना, राष्ट्रवादी पक्षफुटीची अंदर की बात

# आदित्य ठाकरेंना पुढे केल्यामुळेच एकनाथ शिंदे बाहेर पडले!

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

**शिवसेना पक्ष किंवा राष्ट्रवादी नेमका फुटला कसा याबद्दल वेगवेगळ्या थिअरी मांडल्या जातात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पक्ष फोडला असेही सांगितले जाते. पण उद्धव ठाकरेंचा पक्ष आदित्य ठाकरेंना नेता बनविण्याच्या नादात फुटला, असा गौप्यस्फोट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वाहिनीवरील मुलाखतीत केला.**







फडणवीस म्हणाले की, उद्धव ठाकरेंचा पक्ष सर्वात आधी कुणी फोडला तर तो शरद पवारांनी फोडला. १९९२मध्ये जेव्हा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे जिवंत होते, तेव्हा ते काँग्रेसचे विरोधक होते. तेव्हा तो पक्ष फोडला. छगन भुजबळ यांच्यासमवेत १३ लोक बाहेर पडले. पण पुढे त्याच शरद पवारांसोबत जाऊन उद्धव ठाकरे मुख्यमंत्री बनले.

फडणवीसांनी सांगितले की, त्यांचा पक्ष असो की शरद पवारांचा त्यासाठी ते आमच्यावर खापर फोडू शकत नाहीत. एकनाथ शिंदे बाळासाहेबांचे कट्टर शिवसैनिक होते. पण त्यांच्या लक्षात आले की, आदित्य ठाकरेंना नेता करण्यासाठी शिंदेंचे पंख छाटण्याचे काम सुरू आहे. त्यांच्या खात्याच्या मीटिंगही आदित्य घेत होते. एकीकडे काँग्रेससोबत जाऊन हिंदुत्वाचे नुकसान झाले आहे त्यातच आमचे पंखही छाटले जात आहेत हे लक्षात आल्यावर शिंदेंना वाटू लागले की, आता मी कृती केली नाही तर मी राजकारणातून संपुष्टात येईन. त्यावेळी त्यांनी बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. >> पान...३ वर

## ‘तुमच्या बाटग्या विचारांना हिंदू धर्माने कधीही स्थान दिले नाही!’

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

भाजपाचे मत्स्यउद्योग मंत्री व आमदार नितेश राणे यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर शरसंधान केले आहे. आव्हाड यांनी सनातन धर्माबद्दल एक्सवर पोस्ट केली आहे. त्यावरून नितेश राणे यांनी आव्हाडांचा खरपूस समाचार घेतला आहे.



नितेश राणे यांनी म्हटले आहे की, ‘हिंदू दहशतवाद’ किंवा ‘सनातनी दहशतवाद’ ही भाषा भारताच्या हिंदू आणि संत परंपरेला बदनाम करण्यासाठी तयार केलेली व्याख्या आहे. आधी सुशीलकुमार शिंदे मग पृथ्वीराज चव्हाण आणि आता जितेंद्र आव्हाड ती भाषा वापरत आहेत आणि हिंदू धर्माला बदनाम करण्याचा प्रयत्न करतात. जितेंद्र आव्हाड यांच्या या वक्तव्याशी शरद पवार साहेब आणि सुप्रियाताई सुळे सहमत आहेत का? राष्ट्रवादी शरद पवार गटाचीही भूमिका हीच आहे का? हे त्यांनी स्पष्ट करावं. >> पान...३ वर

## नितीन गडकरी यांचे घर बॉम्बने उडवण्याची धमकी

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपूर येथील निवासस्थानी बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली आहे. नागपूर पोलिसांच्या आपत्कालीन क्रमांक ११२ वर ही धमकी दिली गेली. यानंतर पोलिसांनी गडकरींच्या घराची तातडीने झडती घेतली. गडकरींचं वर्धा रोडवरील ‘एनरिको हाइट्स’ या निवासस्थानी रविवारी सकाळी ८:४६ वाजता ही धमकी दिली गेली. एक अज्ञात व्यक्तीने पोलिसांच्या ११२ नंबरवर कॉल करून ही माहिती दिली होती.



धमकी मिळताच प्रतापनगर पोलीस ठाण्याला तत्काळ सूचना देण्यात आली आणि पोलिसांनी गडकरींच्या निवासस्थानी धाव घेतली. तपासणीदरम्यान कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आली नाही, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. झोन-१ चे डीसीपी ऋषिकेश रेड्डी यांनी सांगितले की, पोलिसांनी अज्ञात कॉल करणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे आणि त्याचा शोध सुरू आहे. कॉल करणाऱ्याची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. >> पान...३ वर

### ५ ऑगस्ट २०२५ रोजी ६ वर्षे पूर्ण होत आहेत

# जम्मू आणि कश्मीरमधून अनुच्छेद ३७० हटवून झाली ६ वर्षे

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

जम्मू आणि कश्मीरमधून अनुच्छेद ३७० हटवल्याला ५ ऑगस्ट २०२५ रोजी ६ वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक निर्णयामुळे जम्मू-कश्मीरमध्ये प्रशासन, पायाभूत सुविधा आणि नागरी सहभागाच्या दृष्टीने लक्षणीय बदल झाला आहे. या निर्णयामुळे राज्याचा विशेष दर्जा संपुष्टात आला आणि जम्मू-कश्मीरला पूर्णपणे भारतीय संविधानाच्या चौकटीत समाविष्ट करण्यात आले.



राजकीय वादविवाद असूनही केंद्र सरकारचा भर जनकल्याण, लोकशाही मजबूत करणे आणि आर्थिक प्रगती यावर राहिला आहे. या बदलांपैकी एक महत्त्वाचा बदल म्हणजे लोकशाहीमध्ये नागरिकांचा वाढता सहभाग. पंचायत निवडणुकीत ७०% पेक्षा अधिक मतदान झाले. २०२० मध्ये झालेल्या जिल्हा विकास परिषदेच्या (DDC) निवडणुका या दिशेने मोठे पाऊल ठरल्या. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतही लोकांचा मोठा सहभाग दिसून आला, विशेषतः दक्षिण कश्मीरमधील तरुण सरपंच आणि महिलांचा उल्लेखनीय सहभाग होता.

यासोबतच शिक्षण आणि सक्षमीकरणालाही चालना मिळाली आहे. आयआयटी जम्मू, एम्स अवंतीपोरा (२०२५ पर्यंत सुरू होण्याची अपेक्षा), रियासीतील वैद्यकीय महाविद्यालय यामुळे शिक्षण क्षेत्रात विस्तार झाला आहे. दूरवरच्या भागांतून UPSC उत्तीर्ण विद्यार्थी पुढे आले आणि स्टार्टअप्सना चालना देणारे जॉब फेअरही भरले गेले, ज्यामध्ये अनेक महिलाही सहभागी झाल्या. सरकारी आकडेवारीनुसार, २०१९ नंतर ८०,००० कोटी रुपयांचा गुंतवणूक झाला, ज्यामुळे रोजगारनिर्मिती आणि उद्योजकतेला बळ मिळाले. पायाभूत सुविधा वेगाने विकसित झाल्या. उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक (USBRL) आता पूर्णपणे कार्यरत आहे, ज्यामुळे काश्मीर खोरं देशाशी जोडले गेले आहे.

जोझिला बोगदा (२०२६ पर्यंत पूर्ण), जोड-मोर्ह टनल आणि बनिहाल-काजीगुंड रस्ता बोगदा या प्रकल्पांमुळे वाहतूक व्यवस्था सुधारली आहे. मार्च २०२५ पर्यंत भारतनेट अंतर्गत ९,७८९ फायबर-टू-होम कनेक्शन सुरू झाले असून त्यामुळे डिजिटल साक्षरतेत वाढ झाली आहे. पर्यटन क्षेत्रातही लक्षणीय वाढ झाली आहे. २०२४ मध्ये श्रीनगरला युनेस्कोने ‘वर्ल्ड क्राफ्ट सिटी’ हा सन्मान दिला आहे. श्रीनगरसाठी दररोजच्या उड्डाणांची संख्या २०१९ मधील ३५ वरून २०२४ मध्ये १२५ पर्यंत पोहोचली आहे.